प्रेस नोट दि.२९/०३/२०१९

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करुन पळुन गेलेल्या सराईत आरोपी जेरबंद

सदर बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ५/३/२०१९ रोजी मुलगी नामे संगिता पाटोळे वय १५ वर्षे (नाव बदलेले) रा.कासेवाडी,भवानी पेठ पुणे ही तिचे कुटुंबासह तिचे राहते घराचे वरील पत्र्याचे रुममध्ये झोपली असताना, रात्री ०१/०० वा सुमारास अनोळखी इसम उंचीने ५ फुट, रंगाने गोरा, डोक्याचे केस बारीक याने पत्र्यावर चढुन घरात प्रवेश करुन ति अल्पवयीन मुली झोपेत असतांना तिचे मनास लज्जा उपन्न होईल असे कृत्य केले होते, त्याबाबत खडक पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्तीचे विरोधात गुन्हा दाखल केला होता.

त्या कालावधीत नंतर कासेवाडी परिसरात रात्र-अपरात्री पत्र्यावर कोणीतरी इसम पळुन जात असल्याची घटना वांरवांर घडत होती, तेथील राहणारे नागरीकांमध्ये विशेष करुन महिला व मुलीमध्ये एक प्रकारची घबराट निर्माण झाली होती, त्या संदर्भात पोलीस कंन्ट्रोल रुमध्ये दररोज सदर परिसरातुन ८ ते १० कॉल रात्रीचे वेळेस येत होते.श्री.राजेन्द्र मोकाशी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांनी सदर परिसरात तपास पथकाचे मार्फतीने कोबींग आप्रेशन राबविण्यात आले. रात्रीची गस्त वाढविण्यात आली होती, त्यावेळेस तपास पथकाचे कर्मचारी पोकॉ ८९४८ आशिष चव्हाण व पोकॉ ८८२९ महावीर दावणे यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, कासेवाडी परिसरात पत्र्यावर चढुन नागरीकांचे मनामध्ये दहशत निर्माण करणारा व अल्पवयीन मुलीचा छेड काढणारा खडक पोलीस स्टेशनकडील सराईत गुन्हेगार सोनु मनोज शिरसवाल रा.शिवनेरी कोंढवा पुणे हा शिवनेरी नगर रिक्षा स्टॅण्ड कोंढवा पुणे येथे थांबला आहे, सदर बातमी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी यांना सांगुन त्यांनी सदर इसमास ताब्यात घेणेबाबत आदेश दिल्याने त्यास शिवनेरीनगर कोंढवा परिसरातुन ताब्यात घेण्यात आले, त्याचेकडे सदर गुन्हयाबाबत तपास करता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली असुन त्यास अटक करण्यात आली आहे. सदरचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री.एस.एस पांढरे करीत आहेत.

सदर आरोपीवर वेगवेगळया पोलीस स्टेशनला खालील प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र | पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १ | खडक | २२/२०१० भा.दं.वि क ३७९ |
| २ | खडक | १४/२०१०भा.दं.वि क ४५४,४५७,३८० |
| ३ | खडक | १५/२०१० भा.दं.वि क ४५४,४५७,३८० |
| ४ | खडक | ८१/२०१० भा.दं.वि क ३७९,३७ |
| ५ | वानवडी | १६३/२०१५ भा.दं.वि क ३६३,३९४,३४ |
| ६ | वानवडी | ९३/२०१५ भा.दं.वि क ३२३,४२७,३४ |
| ७ | वानवडी | ४५४/२०१७ भा.दं.वि क ३२३, ३२४,३४ |

अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहे.

खडक पोलीस स्टेशन तर्फे सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, उन्हाळयामध्ये रात्रीचे वेळेस आपले घराचे दारे, खिडक्या उघडे ठेवुन झोपु नये जेणे करुन चोरांना चोरी करण्याची संधीचा उपलब्ध होईल, याची खबरदारी सर्व नागरीकांनी घ्यावी.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीसं स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तमराव चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विठ्ठल पाटील, विनोद जाधव, संदिप पाटील, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, समीर माळवदकर, बंटी कांबळे, राकेश क्षिरसागर, रवी लोखंडे, महावीर दावणे,इम्रान नदाफ, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.

पोलीस नि